May-2023

# लाड महाविद्यालयात पारितोषिक वितरण



**कुंडल : येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करताना शरद लाड.**

**कुंडल :** जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्य व कठोर परिश्रम घेऊन जिद्दीने वाटचाल करावी, असे मत माजी जि. प. सदस्य शरद भाऊ लाड यांनी व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कार्यकर्ते व्ही. वाय. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी कोणत्याही आवडीच्या क्षेत्रात यश मिळवावे कौशल्य आत्मसात करावी सर्वांगीण विकास साधावा. आपल्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवावे. महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल म्हणाले, महाविद्यालयात सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून एनसीसी व स्पर्धा परीक्षा बेसिक कोर्स सुरू होणार आहोत याचा लाभ घ्यावा. डॉ. बी. डी. वाघमारे, डॉ. एम. जी. सदामते, डॉ. एस. जी. चवरे यांचा विशेष प्रावीण्य मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. गोविंद डुबल, संचालक डॉ. व्ही. डी. पाटील, एस. डी. लाड, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. एन. के. गुंड यांनी आभार मानले.

दै. सकाळ
दि. १९/०५/2023

# विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे व समाजाचे नाव मोठे करावे : शरद लाड

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे व समाजाचे नाव मोठे करावे. या महाविद्यालयात शिकून विद्यार्थी जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होईल व या महाविद्यालयास यश मिळवून देईल, असे मत माजी जि. प. सदस्य शरद लाड यांनी व्यक्त केले.



**क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात बोलताना शरद लाड. सोबत मान्यवर.**

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डी. वाय. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी कोणत्याही आवडीच्या क्षेत्रात यश मिळवावे कौशल्य आत्मसात करावी सर्वांगीण विकास साधावा.

महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. आर. एस. डुबल म्हणाले, महाविद्यालयात सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून एनसीसी व स्पर्धा परीक्षा बेसिक कोर्स सुरू करणार आहोत तरी याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. यावेळी डॉ. बी. डी. वाघमारे, डॉ. एम. जी. सदामते, डॉ. एस. जी. चवरे विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास गांधी एज्युकेशन सोसायटीचे सचिव गोविंद डुबल, संचालक डॉ. व्ही. डी. पाटील, एस. डी. लाड, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.आभार एन. के. गुंड यांनी मानले.

दै. केसरी

दि. 19/05/2023